CNRMHAH1900 1848 2023

**<u>रे मु नं ४२७/२०२३ मध्ये नि. २३ वर आदेश</u>**
( गोरखनाथ सुखदेव वि. अंकुश सुखदेव )

सदर अर्जात प्रतिवादीने असे नमूद केले आहे की प्रतिवादीस महत्वाची माहिती व कागदपत्रे न मिळाल्यामूळे कैफियत व कमिशनर नेमणूकीच्या अर्जावर म्हणणे देण्यास उशीर झालेला आहे. सदरचा उशीर माफ होउन अर्जासोबत कैफियत व म्हणणे दिले आहे ते स्वीकारण्यात यावे.

२- वादीने अर्जास म्हणणे देउन प्रतिवादीची कथने फेटाळली. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादीला समन्स दि. ०९.११.२०२३ रोजी बजावले असून कायदेशीर ९० दिवसांची वेळ संपलेली आहे. प्रतिवादी मुद्दाम म्हणणे देत नाही. सबब अर्ज रद्द करण्यात यावा. अर्ज मंजूर करायचा झाल्यास रु.५००/- कॉस्ट देण्यात यावी.

३- वादी व प्रतिवादीचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्र पाहिले.

४- वादीने सदरचा दावा अतिक्रमीत भागाचा कब्जा मिळण्यासाठी व निरंतर मनाई ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. या अर्जाद्वारे प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की प्रतिवादीला वादीच्या दाव्याला कैफियत देण्यास व कमिशनरच्या अर्जाला म्हणणे देण्यास उशीर झालेला असून तो माफ करण्यात यावा व म्हणणे स्वीकारण्यात यावे. रेकॉर्ड पाहता दाव्यामध्ये वादीने नि.७ वर दावा दाखल करतेवेळी कोर्ट कमिशनर नेमणूकीचा अर्ज केला होता परंतु सदर अर्जावर प्रतिवादीस वेळेत म्हणणे देता आले नाही. तसेच प्रतिवादीने वादीच्या दाव्याला कैफियतही दिलेली दिसून येत नाही. प्रतिवादीविरुध्द अद्याप 'म्हणणे नाही' असा आदेश पारित झालेला नाही. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की महत्वाची माहिती व कागदपत्रे न मिळाल्यामूळे कैफियत व कमिशनर नेमणूकीच्या अर्जावर म्हणणे देण्यास उशीर झालेला आहे. प्रतिवादीने दिलेले कारण संयुक्तिक वाटते. प्रतिवादीने सदरचे कथन शपथेवर केले आहे त्यावर अविश्वास ठेवता येणार नाही. वादीने नि.७ वर कमिशनरची नियुक्ती करण्याबाबत अर्ज दिलेला आहे त्यावर प्रतिवादीचे म्हणणे येणे आवश्यक आहे. प्रतिवादीचे म्हणण्याशिवाय नि.७ चा अर्ज व निरंतर ताकिदीचा अर्ज निकाली काढणे न्यायोचित होणार नाही. दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. त्यामुळे अर्ज गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रतिवादीचे

म्हणणे रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परंतु सदरचा अर्ज देण्यास प्रतिवादीने उशीर केला आहे त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज रु. १००/- कॉस्ट आकारुन मंजूर करणे न्यायोचित होईल. वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

१. प्रतिवादीचा अर्ज रु. १००/- कॉस्ट आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. कॉस्टची रक्कम अदा केल्यानंतर प्रतिवादीने कैफियत व कमिशनर नेमणूकीच्या अर्जावर म्हणणे द्यावे.

SANJANA UDAY JAGUSTE Digitally signed by SANJANA UDAY JAGUSTE Date: 2024.03.21 17:17:25 +0530

दि. २१.०३.२०२४
शेवगाव

(एस. यू. जागुष्टे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर शेवगाव